International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue. 3 Jan-Feb-2022

# विवाहाचा इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकार या घटकांबाबत तुलनात्मक अभ्यास.

शितल भागवत जाधव[1] प्रा. डॉ. रमेश पठारे[2]
[1,2]एस.एन.डी.टी विदयापिठ, पुणे

**प्रस्तावना**

काही व्यक्ती या आयुष्यात मिळविलेल्या यशाबद्दल निराश असतात. आहे त्या परिस्थितीचा स्विकार करण्यात अपयशी ठरतात. तर काही आहे त्या परिस्थितीचा सक्षमतेने स्विकार करतात, नवीन अनुभव, आव्हान स्विकारू शकतात, आयुष्याचा अर्थ शोधतात. इतरांशी सकारात्मक संबंध टिकविणे काहींना खुप सोपे जाते पण काहींना इतरांशी सकारात्मक संबंध टिकविण्यात अडचणी जाणवतात. इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व- स्विकार हे दोन घटक व्यक्तीच्या प्रगतीसाठी, सकारात्मक मानसिक, भावनिक, सामाजिक आरोग्यासाठी, सुखी कुटूंबासाठी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात यशस्वी होण्यासाठी खुप महत्वाचे आहे हे घटक वैवाहिक जीवनात स्त्री-पुरूषांमध्ये किती प्रमाणात आहे? जीवणाच्या प्रत्येक टप्यात त्यांचा कसा संबंध आहे? हे जाणुन घेण्यासाठी संशोधिकेला सदर संशोधनाची गरज वाटली.

**संशोधनातील संकल्पनांच्या व्याख्या**

सदर संशोधनात अभ्यासिलेल्या संकल्पनांच्या व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

**स्व-स्वीकार**

एखादयाचा भूतकाळ, स्वत:चे सकारात्मक मूल्यांकन करणे आणि स्वत:च्या जीवनातील गतकालीन घटनांचा स्विकार करणे म्हणजे स्व-स्विकार होय. स्व-स्वीकृती म्हणजे असे पद जे एखादयाला स्वत:कडे पाहण्याची सकारात्मक वृत्ती प्रदान करते. स्वत: विषयी सकारात्मक वृत्ती स्वत:मध्ये असलेल्या गुणांचा स्वीकार करणे, आयुष्यात घडलेल्या घटना सकारात्मकतेने घेणे स्व-स्वीकार म्हणजे स्वत:कडे असलेली सकारात्मक अभिवृत्ती होय, स्व-च्या विविध स्वरूपाचा स्वीकार व भूतकाळातील जीवनाविषयी सकारात्मक भाव व्यक्त होणे म्हणजे स्व-स्वीकार होय.

रायफ, १९८९, पी १०७२

**इतरांशी सकारात्मक संबंध**

इतरांबरोबर उच्च गुणवत्तेचे अनुबंध म्हणजे इतरांशी सकारात्मक संबंध होय..

**इतरांशी सकारात्मक सबंध**

इतरांशी सकारात्मक सबंध असणा-या व्यक्तींमध्ये इतरांबरोबरचा उबदारपणा, समाधानी वृत्ती, तद्नुभूती, दुस-यांच्या कल्याणाकरिता संबंधित असतात, विश्वासार्हतेचे संबंध, समाधानकारक, तीव्र सहानुभूती, प्रेमळपणा किंवा जिव्हाळा, जवळीकता, आपुलकी, मानवी सबंध देणे-घेणे समजू शकते आणि आत्मियतेसाठी सक्षम आहे या प्रकारची गुणवैशिष्ट्ये असतात. ज्या व्यक्तींना इतरांशी सकारात्मक संबंध टिकविण्यास अडचणी येतात त्यांना जवळचे संबंध टिकवुन ठवणे हे फार अवघड वाटते, मोकळे होण्यास अवघडपणा वाटतो. आंतरवैयक्तिक संबंधात दुरावा, वैफल्यग्रस्त आणि इतरांबरोबर महत्वाचे आधारयुक्त अनुबंध करण्यातील तडजोडीत अनिच्छा, वैफल्यग्रस्त वाटते (-) यांसारख्या विधानातून अजमावलेले मत इतरांबरोबरचे सकारात्मक संबंध दर्शवितात. रायफ, १९८९, पान नं १०७२

**गार्सिया आणि इतर ( २०१४ )**

यांनी परिणामकारक एका बाजुने दिसणारे मानवी चेहरे, मानसशास्त्रीय सुस्थिती आणि सुसंवाद : पर्यावरणीय प्रभुत्व आणि स्व-स्वीकृती या कर्णमधुर जीवनाचा अंदाज लावते. या सदर संशोधनात नमुना म्हणुन ५०० व्यक्तीची निवड

केली. त्यात १८७ पुरूष आणि ३१३ स्त्रिया घेण्यात आल्या. सदर संशोधनाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे घेण्यात आले. मानसशास्त्रीय सुस्थितीचे पर्यावरणीय प्रभुत्व, स्व-स्वीकृती, स्वायत्तता, वैयक्तीक वाढ, जीवन उद्देश हे घटक उच्च दिसुन आले. या व्यतिरिक्त जीवन सुसंगततेचे ४७ टक्के ते ६६ टक्के फरक होते. स्वायत्ततेचे गुणांक स्व-विध्वंसकतेच्या तुलनेत उच्च दिसुन आले. जीवनाचा उद्देश हा उच्च दिसुन आला. निम्न भावना प्रधान आणि स्व-विध्वंसकतेच्या तुलनेत उच्च संवेदनशिल व्यक्तींनी वैयक्तीक वाढीपेक्षा लक्षणीय उच्च पातळी नोंदवली. कमी सकारात्मक अनुभव असूनही कमी प्रभावित व्यक्तींना त्यांच्या स्वतःच्या मतांबद्दल आत्मविश्वास वाटतो. स्व-विध्वंसक गटाने मानसशास्त्रीय सुस्थिती आणि कर्णमधुर जीवनाच्या आनंदाची निम्न पातळी नोंदविली. स्व-परिपुर्ण व्यक्तींची उच्च पातळी होती.

**मात्ुद आणि इतर ( २०१९ )**

यांनी लिंग आणि मानसशास्त्रीय सुस्थिती या विषयावर संशोधन केले. सदर संशोधनात नमुना म्हणुन १७०० स्त्रिया आणि १७०० पुरूष यांची निवड केली. ज्यांचे वय २१ ते ६४ होते. पुरूषांनी स्व-स्विकार आणि स्वायत्तता यात महिलांपेक्षा जास्त गुण मिळविले. तसेच वैयक्तिक वाढ आणि इतरांशी सकारात्मक संबंध असलेल्या स्त्रियांनी पुरूषांपेक्षा जास्त गुण मिळविले. महिला आणि पुरूष दोघांच्याही मानसशास्त्रीय सुस्थिती पैकी सर्वात जास्त बदल पुरूषांचे होते. स्त्रियांची सुस्थिती उच्च दिसुन आली. पारंपारिक लिंग भुमिकेचे पालन करणे हे महिला आणि पुरूषांच्या मानसशास्त्रीय सुस्थितीशी संबंधित होते. अस्तित्व, स्व-स्विकृती आणि स्वायत्तता यात स्त्रियांचे निम्न गुण दिसुन आले. स्पेनमध्ये स्त्रिया पुरूषांपेक्षा जास्त गुण वैयक्तिक वाढीत मिळवितांना दिसुन आल्या. तसेच शिक्षण आणि रोजगार सुस्थितीशी संबंधित दिसुन आले. संशोधनात सातत्याने मानसिक सुस्थितीत लिंगभेद आढळतात. परंतु स्त्रिया आणि पुरुष यांच्या मानसशास्त्रीय सुस्थितीच्या फरकांचे अभ्यास निष्पन्न झाले नाही. या अभ्यासाचे उद्दिष्ट मानसशास्त्राशी संबंधित लिंगाच्या सुसंगततेचे परिक्षण करणे होते. पुरूषांपेक्षा स्त्रियांची सकारात्मक सुस्थिती उच्च होती. महिला आणि पुरूष गटांचे वय आणि शैक्षणिक स्तर समान होता.

**संशोधनाचा हेतु -**

1. विवाहित स्त्री-पुरूषांचे इतरांशी सकारात्मक संबंध अभ्यासणे.
2. विवाहित स्त्री-पुरूषांचा स्व-स्विकार अभ्यासणे.

**संशोधनातील सिध्दांतकल्पना**

सदर अभ्यासाची उद्दिष्टये पुर्ण करण्यासाठी पुढील प्रमाणे सिध्दांतकल्पना मांडल्या आहे.

1. स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या इतरांशी सकारात्मक संबंध या घटकाबाबत फरक आढळतो.
2. स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या स्व-स्विकार या घटकाबाबत फरक आढळतो.

**संशोधनाची कार्यपध्दती**

**प्रस्तुत संशोधनातील परिवर्तकांचे स्वरूप**

| अ.क्र | संशोधनातील परिवर्तके | घटक |
|---|---|---|
| १ | स्वतंत्र परिवर्तके | स्त्री-पुरूष |
| २ | परतंत्र परिवर्तके | इतरांशी सकारात्मक संबंध<br>स्व-स्विकार |

संशोधनातील नमुना निवड - प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असताना अनेक अवांतर परिवर्तकांवर नियंत्रण ठेवणे शक्य नसल्याने तसेच अप्रायोगिक अभ्यास पध्दती असल्याने समष्टीमधून यादृच्छिक पध्दतीने नमूऩ्याची निवड करणे शक्य नव्हते. त्यामुळे प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असतांना असंभाव्यता पध्दतीने नमुन्याची निवड केलेली आहे.

**नमुन्याचे सर्वसाधारण स्वरूप -**

| अ.क्र | गट | वय | शिक्षण | संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | विवाहित स्त्रिया | २५ ते ४० | दहावी ते पदवी पर्यंत | ५० |
| २ | विवाहित पुरूष | २५ ते ४० | दहावी ते पदवी पर्यंत | ५० |

**प्रदत्त संकलन प्रक्रिया -**

२५ ते ४० वयोगटातील महाराष्ट्रातील शहरी भागात राहणा-या विवाहित स्त्री-पुरूषांची निवड केली.

शिक्षण - १० वी ते पदवी या निकषात बसणा-या प्रौढांना चाचणी बद्दल माहिती समजावुन सांगितली. स्वतःहुन सहभाग घेणा-या स्त्री-पुरूषांची निवड केली व चाचणी सोडवुन घेतली. चाचणीचा हेतु समजावून सांगितला वेळेचे काटेकोरपणे पालन केले. सुचना हया हस्तपुस्तिकेत दिल्याप्रमाणे दिल्या. विधान न समजल्यास अर्थ समजावून सांगितला. एकही विधान रिकामे राहणार नाही याची काळजी घेतली. चाचणी सोडवितांना अडचण आल्यास त्याविषयी मार्गदर्शन केले.

**संशोधनातील साधने**

**संशोधनात वापरलेली उपलब्ध प्रमाणित मानसशास्त्रीय चाचणी**

विवाहित व्यक्तिंचा इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकाराचे मापन करण्यासाठी खालील प्रमाणित मानसशास्त्रीय चाचणीचा उपयोग केला आहे.

मानसशास्त्रीय सुस्थिती चाचणी - कॅरोल राईफ १९८९

**मनोमितीय माहिती**

हया चाचणीत एकुण ८४ विधाने आहेत जे ६ मुख्य घटकांचे मुल्यांकन करण्यासाठी तयार केले आहे. त्यातील दोन घटकांवर सदर संशोधन करण्यात आले आहे. ते दोन घटक म्हणजे इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकार या चाचणीत प्रत्येकी १४ विधानांचा समावेश आहे. चाचणीतील विधाने मानसशास्त्रीय सुस्थितीशी सबंधित आहे. चाचणीची विश्वसनियता ही ०.८६ ते ०.९१ इतकी उच्च दिसुन आली. चाचणीची वैधता ०.८३ आणि ०.९९ इतकी उच्च दिसुन आली. सपूंर्ण इन्स्ट्रमेंटसाठी स्कोअर पातळी ८४ ते ५०४ आहे.

**माहितीचे वर्गीकरण करण्यासाठी वापरलेली संख्याशास्त्रीय साधने -**

मध्यमान इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकाराचे मापन यामध्ये विवाहित स्त्री-पुरूषांनी प्राप्त केलेल्या गुणांची सरासरी काढून तुलना करण्यासाठी मध्यमान या साधनाचा वापर करण्यात आला आहे. प्रमाणविचलन चाचणीतील विवाहित स्त्री-पुरूषांच्या इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकार या घटकांच्या गुणांची तुलना करण्यासाठी, 'टी' परिक्षिका काढण्यासाठी आवश्यक म्हणून प्रमाणविचलन काढले. 'टी' परीक्षिका. इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकार या चाचणीत विवाहित स्त्री-पुरूषांनी मिळविलेल्या गुणांच्या मध्यमानातील फरकाची सार्थकता तपासण्यासाठी 'टी' प**रीक्षिकेचा वापर करण्यात आला. तसेच** इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकार या चाचणीत विवाहित स्त्री-पुरूषांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी 'टी' परीक्षिकेचा वापर करण्यात आला.

**फलिते आणि चर्चा** - विवाहित व्यक्तिंचा इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकार गुणांकांची सरासरी काढून त्या सरासरीमधील भेद सांख्यिकीय दृष्टया सार्थ ठरतो का? हे पाहिले.

संकलित माहितीच्या आधारे प्राप्तांकाचे सांख्यिकीयविश्लेषण, फलितांची नोंद आणि सिध्दांत कल्पनेच्या आधारे पुढील चर्चा करण्यात आली आहे. विवाहित व्यक्तिंचा इतरांशी सकारात्मक संबंध आणि स्व-स्विकाराचे प्रमाण निर्देशित करणारी सरासरी मूल्ये, प्रमाण विचलन आणि टी मूल्ये

| अ. क्र | समुह | प्रयुक्त संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्राप्त 'टी' मुल्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | इतरांशी सकारात्मक संबंध असलेले स्त्री प्रयुक्त | ५० | ५०.६ | ७.०५ | ०.७२० |
| २ | इतरांशी सकारात्मक संबंध असलेले पुरूष प्रयुक्त | ५० | ५१.६ | ७.३९ | |
| ३ | स्व-स्विकार असलेले स्त्री प्रयुक्त | ५० | ६४.६ | ७.४२ | १.०२२ |
| ४ | स्व-स्विकार असलेले पुरूष प्रयुक्त | ५० | ६६.२ | ८.५९ | |

इतरांशी सकारात्मक संबंध (प्राप्त 'टी' मूल्य ०.७२० हे ९८.० स्वाधीनता मात्रेवर ०.०१ स्तरावर असार्थ आहे)

स्व-स्विकार (प्राप्त 'टी' मूल्य १.०२२ हे ९८.० स्वाधीनता मात्रेवर ०.०१ स्तरावर असार्थ आहे.)

**अर्थनिर्वचन**

सदर सारणी क्रमांका नुसार विवाहित स्त्री-पुरूषांच्या इतरांशी सकारात्मक संबंध या चाचणी गुणांकाचे मध्यमान काढले असता चाचणीचे स्त्रियांचे मध्यमान ५०.६ आले. प्रमाण विचलन काढले असता प्रमाण विचलन ७.०५ आले. तर इतरांशी सकारात्मक संबंध चाचणीचे पुरूषांचे मध्यमान हे ५१.६ इतके आले. तर प्रमाण विचलन हे ७.३९ इतके आले. या मध्यमानातील फरकांची सार्थकता ०.०१ सार्थकता स्तरावर तपासली असता. प्राप्त 'टी' मूल्य हे प्रमाणित 'टी' मूल्यापेक्षा (०.७२०≥ २.६३) ९८.० स्वाधीनता मात्रेवर असार्थ असल्याचे दिसुन येते. म्हणुन शून्य परिकल्पना स्वीकारावी लागेल व मुख्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. याचा अर्थ असा की स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या इतरांशी सकारात्मक संबंध या घटकाबाबत फरक आढळतो. ही निरीक्षणे गृहीतकाला अनुसरून नाहीत. त्यामुळे त्यात लक्षणियरित्या फरक दिसुन येत नाही.

सदर सारणी क्रमांका नुसार विवाहित स्त्री-पुरूषांच्या स्व-स्विकार या चाचणी गुणांकाचे मध्यमान काढले असता चाचणीचे स्त्रियांचे मध्यमान ६४.६ आले. तर प्रमाण विचलन काढले असता ७.४२ आले. तर स्व-स्विकार चाचणीचे पुरूषांचे मध्यमान हे ६६.२ इतके आले. तर प्रमाण विचलन हे ८.५९ इतके आले. या मध्यमानातील फरकांची सार्थकता ०.०१ सार्थकता स्तरावर तपासली असता. प्राप्त 'टी' मूल्य हे प्रमाणित 'टी' मूल्यापेक्षा (१.०२२≥ २.६३) ९८.० स्वाधीनता मात्रेवर असार्थ असल्याचे दिसुन येते. म्हणुन शून्य परिकल्पना स्वीकारावी लागेल व मुख्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. याचा अर्थ असा की स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या स्व-स्विकार या घटकाबाबत फरक आढळतो. ही निरीक्षणे गृहीतकाला अनुसरूण नाहीत. त्यामुळे त्यात लक्षणियरित्या फरक दिसुन येत नाही. थोडक्यात वरील फलिते व चर्चा लक्षात घेता निश्चितपणे असे म्हणता येईल की, स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या स्व-स्विकार या घटकांबाबत म्हणजे स्व-स्वीकार या चाचणीत स्वतःकडे असलेली सकारात्मक अभिवृत्ती, स्व-च्या विविध स्वरूपाचा स्वीकार व भूतकाळातील जीवनाविषयी सकारात्मक भाव व्यक्त होणे या घटकांबाबत अर्थपुर्ण भिन्नता दिसुन येत नाही. इतरांशी सकारात्मक संबंध या चाचणीत इतरांबरोबरचा उबदारपणा, समाधानी वृत्ती, तद्नुभूती, दुस-यांच्या कल्याणाकरिता संबंधित असतात, विश्वासार्हतेचे संबंध, समाधानकारक, तीव्र सहानुभूती, प्रेमळपणा किंवा जिव्हाळा, जवळीकता आपुलकी, मानवी सबंध देणे-घेणे समजू शकते आणि आत्मियता या घटकांबाबत अर्थपुर्ण भिन्नता दिसुन येत नाही.

मध्यमानावरून पाहिले असता स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये इतरांशी सकारात्मक संबंध हे काहीसे अधीक आढळतात. तसेच स्त्रियांपेक्षा पुरूषांमध्ये स्व-स्विकार हा अधीक आढळतो.

**समारोप**

अशा प्रकारे प्रस्तुत प्रकरणात संशोधिकेने संशोधनातून मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण कोष्टक व सारणी स्वरूपात करून संख्याशास्त्रीय विश्लेषणाच्या आधारे अर्थनिर्वचन केले आहे.

**निष्कर्ष**

1. स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या इतरांशी सकारात्मक संबंध या घटकाबाबत लक्षणियरित्या फरक दिसुन येत नाही.
2. स्त्रियांपेक्षा पुरूषांच्या स्व-स्विकार या घटकाबाबत लक्षणियरित्या फरक दिसुन येत नाही.

**पुढील संशोधनासाठी सूचना**

वरील संदर्भाचा अभ्यास विवाहित स्त्री-पुरूषांच्या इतरांशी सकारात्मक संबंध व स्व-स्विकार यांच्या संदर्भात केल्यावर त्यांचे इतरांशी सकारात्मक संबंध व स्व-स्विकार वाढविण्यासाठी प्रयोगात्मक पध्दत वापरून उपाययोजना करू शकतो.

पुस्तके

1. सी.पी.लभाणे., जे, सोनटक्के. एस.सावदेकर, सकारात्मक मानसशास्त्र (सप्टेंबर २०१७) प्रशांत प्रकाशन, जळगांव ४२७०१.
2. व्ही.शिंदे., सकारात्मक मानसशास्त्र ( जुन, २०१६ ), डायमंड प्रकाशन, पुणे ४११ ०३०
3. सी.बडगुजर, पी. वरखेडे, सकारात्मक मानसशास्त्र ( ७ सप्टेंबर, २०१६ ) प्रशांत प्रकाशन, जळगांव ४२७००१
4. लेखक- दलिप सिंह, पुस्तकाचे नाव-भावनिक बुध्दिमत्ता एक व्यावसायिक मार्गदर्शन डायमंड पब्लिकेशन्स व्दितीय मराठी आवृत्ती - २०१०
5. ISBN No- 978-81-8483-352-2
6. Garcia et al. (2014), The affective profiles, psychological well-being, and harmony: environmental mastery and self-acceptance predict the sense of a harmonious life.
7. PeerJ 2:e259; DOI 10.7717/peerj.259
8. Matud, M. P., López-Curbelo, M., & Fortes, D. (2019). Gender and psychological well-being. *International journal of environmental research and public health*, *16*(19), 3531.

**References**

1. The jamovi project (2021). *jamovi*. (Version 2.2) [Computer Software]. Retrieved from https://www.jamovi.org.
2. R Core Team (2021). *R: A Language and environment for statistical computing*. (Version 4.0) [Computer software]. Retrieved from https://cran.r-project.org. (R packages retrieved from MRAN snapshot 2021-04-01).